---

# NSS Report-2022-23

## Department of NSS

❐ २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात सामाजिक भान आणि आपली जबाबदारी ओळखून राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे अनेक समाजोपयोगी कार्यक्रम आणि उपक्रम हाती घेण्यात आले आणि यशस्वीरित्या पार पाडण्यात आले. त्याचा संक्षिप्त अहवाल सारांश रूपाने पुढीलप्रमाणे :-

१. दि. ७ एप्रिल २०२२ रोजी आरोग्य दिनानिमित्त शहरातून प्रभातफेरी काढून लोकांना आरोग्याविषयी माहिती देवून जनजागृती करण्यात आली. या फेरीमध्ये प्रबोधन करणारे फलक, डिजीटल मिडियाचा वापर करून लोकजनजागृती केली. यामध्ये ६२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

२. दि. ११ ते २५ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सप्ताह साजरा करण्यात आला.

* दि. १२ एप्रिल रोजी जिल्हा जात पडताळणी एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस १९ विद्यार्थी सहभागी झाले होते.
* दि. १३ एप्रिल रोजी 'भारतीय संविधान : माझ्या जगण्याचा अधिकार' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. डॉ. अमित बराळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या व्याख्यानात ७५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
* दि. १४ एप्रिल रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक परिवर्तनातील योगदान' या विषयावर व्याख्यान घेण्यात आले. या व्याख्यानास प्रा. राहूल कोसंबी हे प्रमुख पाहुणे लाभले. यामध्ये ६४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.
* दि. १५ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'महिलांबाबत केलेले कार्य' या विषयावर श्री.महाबीर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली व्याख्यान पार पडले. या व्याख्यानामध्ये ७४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.
* दि. १६ एप्रिल २०२२ रोजी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत ४९ विद्यार्थ्यांनी आपले योगदान दिले व संपूर्ण कॉलेज परिसर स्वच्छ केला.
* दि. २५ एप्रिल २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रश्न मंजुषा स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेस १२४ विद्यार्थी उपस्थित होते.
* दि. २५ एप्रिल २०२२ रोजी जिल्हास्तरीय वक्तृत्त्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेमध्ये १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

३. दि. ५ जून २०२२ रोजी जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. यामध्ये पर्यावरणाविषयीची माहिती देण्यात आली. या कार्यक्रमास ६७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

४. दि. ६ जून २०२२ रोजी स्वराज्य दिन-शिवराज्याभिषेक सोहळा दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पहार घालून अभिवादन केले. यानिमित्त महाराष्ट्र गीत गायन आणि पोवाडा यासारखे पौराणिक कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले.

त्याचबरोबर शिवचरित्रावर आधारित गडकिल्ल्यांचे छायाचित्र सादरीकरण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्यावर प्रश्नमंजुषा घेण्यात आली. त्याचबरोबर निबंध स्पर्धादेखील पार पडल्या. या कार्यक्रमास १३४ विद्यार्थी उपस्थित होते.

५. दि. ७ जून ते १३ जून २०२२ असा माझी वसुंधरा 'पर्यावरण जनजागृती आणि स्वच्छता

सप्ताह' साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन करण्यात आले.

* दि.७ जून २०२२ रोजी महाविद्यालय परिसराची स्वच्छता करण्यात आली. या स्वच्छता मोहिमेत ४२ विद्यार्थी सहभागी झाले होते.
* दि.८ जून २०२२ रोजी संपूर्ण देवरुख शहर परिसराची साफसफाई करण्यात आली. यामध्ये ४४ विद्यार्थ्यांनी योगदान दिले.
* दि.९ जून २०२२ रोजी बोटनिकल गार्डन स्वच्छता करण्यात आली. यामध्ये विभागाचे ३८ विद्यार्थी सहभागी झाले होते.
* दि.१० जून २०२२ रोजी देवरुख बस स्टँड परिसरातील साफसफाई करण्यात आली. यामध्ये २५ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेवून स्वच्छता मोहिम पूर्ण केली.
* दि.११ जून २०२२ रोजी महाविद्यालय परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये २६ विद्यार्थी सहभागी झाले होते.
* दि.१२ जून २०२२ रोजी नदीकाठ परिसर स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन करण्यात आले. या स्वच्छता मोहिमेत १० विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी होवून स्वच्छता करण्यात आली.
* दि.१३ जून २०२२ रोजी जैव विविधता या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. श्री. प्रतिक मोरे यांनी व्याख्यानाचा कार्यक्रम पार पाडला. यामध्ये ८५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

६. दि. २१ जून २०२२ रोजी जागतिक योगदीन व्याख्यान आणि प्रशिक्षण या अंतर्गत सौ. वर्षा फाटक यांनी जागतिक योग दिनाविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. योगाचे महत्त्व विशद करून आपल्या आरोग्यासाठी योगा किती महत्त्वाचा आहे हे प्रात्यक्षिकासह विद्यार्थ्यांना पटवून दिले. या व्याख्यानास ५० विद्यार्थी उपस्थित होते.

७. दि. ६ जुलै २०२२ रोजी आधार कार्ड मोबाईल क्रमांकाशी जोडणेविषयक कार्यशाळेचे आयोजन केले होते. आधार कार्डशी मोबाईल जोडणे किती अनिवार्य व गरजेचे आहे याचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगून प्रत्येकाने यामध्ये आपल्या कुटुंबातील सर्वांना मोबाईल लिंक करून घेण्यास सांगितले. यामध्ये ९२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

८. दि. १३ जुलै २०२२ रोजी गुरु पौर्णिमेचे औचित्य साधून गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये 'गुरुशिवाय ज्ञान मिळत नाही', गुरु पौर्णिमेचे महत्त्व विशद करून सांगितले. या महोत्सवात ७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

९. दि. २६ जुलै २०२२ रोजी सल्लागार समितीची बैठक घेण्यात आली. त्यामध्ये आगामी शैक्षणिक वर्षाचे नियोजन करण्यात आले. या समितीचे ९ विद्यार्थी सदस्य म्हणून उपस्थित होते.

१०. दि. २ ऑगस्ट २०२२ रोजी 'हर घर तिरंगा' या भारत सरकारच्या उपक्रमाविषयी विद्यार्थ्यांच्या पालकांना मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. या कार्यक्रमास ३७ विद्यार्थी उपस्थित होते.

११. 'हर घर तिरंगा' सप्ताहाचे उद्घाटन घेण्यात आले व 'समूह राष्ट्रगीत गायन' घेवून कार्यक्रम उत्साहात पार पाडण्यात आला. यामध्ये ८१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

१२. दि. १० ऑगस्ट २०२२ रोजी सायकल रॅलीचे आयोजन करून पांडवकालीन गुहांची साफ सफाई करण्यात आली, त्याचबरोबर महाविद्यालय आवाराची देखील साफसफाई करून घेतली. यामध्ये २२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

१३. दि. १४ ऑगस्ट २०२२ रोजी देवरुखमधील मराठा कॉलनी येथे नगर पंचायत जागेमध्ये वृक्षारोपण करण्याकरिता खड्डे खणण्यात आले. यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

१४. दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी 'स्वातंत्र्य दिन' म्हणून नेहमीच साजरा केला जातो. यावेळी

विद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रम पार पडला. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपणही करण्यात आले. यामध्ये ३२ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष वृक्षारोपण केले.

१५. दि. १७ ऑगस्ट २०२२ रोजी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासमवेत समूह राष्ट्रगीत गायन कार्यक्रम संपन्न झाला. यामध्ये १३१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

१६. दि. २२ ऑगस्ट २०२२ रोजी आधार कार्ड अद्ययावत आणि प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेस ७२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

१७. दि. १७ सप्टेंबर २०२२ रोजी 'आझादी का अमृत महोत्सव' निमित्ताने स्वच्छता सर्वेक्षण रॅली, प्रबोधनकार ठाकरे जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास १४५ विद्यार्थी हजर होते.

१८. दि. २४ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. होते. या कार्यक्रमाचे सौ. स्नेहलता पुजारी यांनी नियोजन केले होते. यामध्ये १३६ विद्यार्थी सहभागी झाले होते.

१९. दि. २ ऑक्टोबर २०२२ रोजी महात्मा गांधी जयंती मोठ्या उत्साहाने पार पडली. यानिमित्त 'अहिंसा (Non-Violence) या विषयाला अनुसरून-

१) निबंध स्पर्धा.

२) घोषवाक्य स्पर्धा.

३) चित्रकला स्पर्धा

४) पोस्टर स्पर्धा.

५) काव्य लेखन.

६) प्रभात फेरी.

अशा विविध स्पर्धांचे आयोजन व नियोजन करण्यात आले होते.

या जयंतीनिमित्त शहरातून प्रभातफेरी काढून 'अहिंसा शपथ' घेण्यात आली. याचबरोबर कॉलेजचे परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यामध्ये ५५ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

२०. दि. २२ ऑक्टोबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या आवारात गांडूळ खतासाठी ३ फूट खड्डा खणण्यात आला. या कामामध्ये १२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

२१. दि. २२ ऑक्टोबर २०२२ रोजी 'पोलीस स्मृती दिन' म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी वीरमरण आलेल्या पोलीस बांधवाना मानवंदना देण्यात आली. यावेळी ७१ विद्यार्थी सहभागी होते.

२२. दि. १ व २ नोव्हेंबर २०२२ रोजी अंध व्यक्तींना प्रशिक्षण कार्यशाळा आणि प्रात्यक्षिक स्वरूपात संबंधितांना मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्यात आले. यावेळी २० विद्यार्थी उपस्थित होते.

२३. दि. १५ नोव्हेंबर २०२२ रोजी 'बिरसा मुंडा जयंती' आणि त्यानिमित्त आदिवासी समुदायाचे प्रश्न, चळवळ, परिणाम आणि त्याची दाहकता याची जाणीव विद्यार्थ्यांना होण्यासाठी वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ३७ विद्यार्थ्यांनी उपस्थिती दर्शविली.

२४. दि. १८ नोव्हेंबर २०२२ रोजी रत्नागिरी सिव्हील हॉस्पीटल आणि देवरुख येथील आरोग्य कर्मचारी यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सदर रक्तदान शिबिरामध्ये २४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी एकंदर ३५ विद्यार्थी उपस्थित होते.

२५. दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून 'दैनंदिन जीवनातील संविधान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये डॉ. अमित बराळे यांनी मागदर्शन केले. यामध्ये संविधानाविषयी माहिती घेतली. या व्याख्यानास ७१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

२६. दि. १ डिसेंबर २०२२ रोजी 'जागतिक एड्स दिन' साजरा करण्यात आला. या दिनानिमित्ताने महाविद्यालयाच्या प्रांगणात आणि तहसिल कार्यालय येथे एड्स जनजागृतीपर पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. जागतिक एड्स दिनानिमित्त शहरातून प्रभात फेरी काढून लोकांमध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने फलक लावण्यात आले. पथनाट्याद्वारे प्रबोधनही करण्यात आले. याबेळी सादर केलेल्या पथनाट्यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तर प्रभात फेरीमध्ये १११ विद्यार्थी सहभागी झाले होते.

२७. दि. ५ डिसेंबर २०२२ रोजी मतदार दिन पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

२८. दि. २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ रोजी ७ दिवसांचे 'श्रम संस्कार निवासी शिबिर' घेण्यात आले. संगमेश्वर तालुक्यातील सायले ग्रामपंचायत सायले येथे सदर शिबिर घेण्यात आले. यामध्ये एकूण ३७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

२९. दि. ५ ते ७ जानेवारी २०२३ रोजी हिमोग्लोबीन आणि आरोग्य याविषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये आपल्या रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण किती असावे? ते योग्य प्रमाणात आहे किंवा नाही यासाठी खास करून मुलींकरिता तपासणी शिबिर घेण्यात आले. यामध्ये १३७ विद्यार्थिनींनी लाभ घेतला. त्याचबरोबर खास मुलांकरिता देखील हिमोग्लोबीन आणि आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये ११३ विद्यार्थ्यांनी त्याचा लाभ घेतला.

३०. दि. ११ जानेवारी २०२२ रोजी पाटगाव येथे वनराई बंधारा बांधण्यात आला. त्याकरिता महाविद्यालयातून ६१ विद्यार्थी सहभागी झाले होते.

३१. दि. १३ जानेवारी २०२३ रोजी प्रादेशिक परिवहन अधिकारी, रत्नागिरी यांच्या प्रमुख उपस्थितीत 'रस्ता सुरक्षा अभियान आणि नागरिकांची जबाबदारी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ४६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

३२. दि. १७ जानेवारी २०२२ रोजी मार्लेश्वर देवस्थान येथे साफसफाई मोहिम आयोजित करण्यात आली होती. यामध्ये २७ विद्यार्थी सहभागी झाले होते.

३३. दि. २१ जानेवारी २०२२ रोजी कोसुंब येथे वनराई बंधारा बांधला. यामध्ये ४५ विद्यार्थी सहभागी झाले.

३४. दि. २३ जानेवारी २०२३ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे जयंती अशा संयुक्तीक जयंती उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ३६ विद्यार्थी उपस्थित होते.

३५. दि. २५ जानेवारी २०२३ रोजी 'मतदार दिन' साजरा करण्यात आला. याबेळी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये मुलींनी व मुलांनी उत्स्फूर्तपणे रांगोळी काढून मतदार दिन उत्साहात साजरा केला. यादिवशी नुकतेच १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांनी आपले मतदार कार्डाची नोंदणी केली. यामध्ये ३९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

३६. दि. ३० जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२३ या कालावधीत 'लोकशाही पंधरवडा' दिन म्हणून साजरा करण्यात आला. या पंधरवड्यात मतदान जनजागृती संदर्भात प्रभात फेरी काढून जनजागृती केली. या फेरीमध्ये ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. या मतदान दिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये ९५ विद्यार्थी सहभागी झाले होते. पथनाट्यातून लोकांमध्ये जागृती निर्माण केली. यामध्ये २० विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. मतदान दिन निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये १८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता.

३७. दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज जयंती' साजरी करण्यात आली. याबेळी विद्यार्थ्यांना छ.शिवाजी महाराजांविषयी चित्रफित दाखविण्यात आली. त्याचबरोबर पोवाडा सादरीकरण करण्यात आले. यामध्ये ९६ विद्यार्थी सहभागी झाले होते.

३८. दि. २३ फेब्रुवारी २०२३ रोजी संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्ताने संपूर्ण महाविद्यालयाचा परिसर साफसफाई करण्यात आला. या साफसफाई मोहिमेत ४९ विद्यार्थी सहभागी झाले होते.

**प्रा. सुनिल सोनावणे**

प्रमुख, कार्यक्रम अधिकारी, रासेयो